**फौजदारी जामीन अर्ज क्र. ४१/२०२६**
**जखमेश्वर शेनफड शिंदे वि. महाराष्ट्र शासन**
(**CNR NO**. **MHBU**20-000093-2026)

## नि.क्र. १ खाली आदेश
## (पारीत दिनांक ११ मार्च २०२६)

०१] अर्जदार – **जखमेश्वर शेनफड शिंदे** याने भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम ४८३ अन्वये पोलीस ठाणे, साखरखेर्डा येथील अपराध क्र. ६५/२०१८, कलम ३९२ सह कलम ३४ भारतीय दंड संहिता खालील प्रकरणात नियमित जामीन मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला.

०२] अभियोग पक्षाच्या कथेनुसार फिर्यादी दिपक मधुकर रिंठे याने पोलीस ठाणे, साखरखेर्डा येथे फिर्याद दिली की, दिनांक १७.०४.२०१८ रोजी सकाळी ०४.०० ते ०४.१६ वाजताचे दरम्यान ग्राम मोहाडी फाटा, ता. सिंदखेड राजा येथे तो आणि साक्षीदार असे शेतात झोपलेले असतांना चार अज्ञात आरोपींनी त्याला व साक्षीदारांना चाकुचा धाक दाखवुन चार मोबाईल किंमत अंदाजे रू. २५,५००/- आणि नगदी रू. २१,०००/- असा एकुण रू. ४६,५०० चा मुद्देमाल धाक दपट करुन चोरून नेला. फिर्यादीच्या रिपोर्ट वरुन पोलीस ठाणे, साखरखेर्डा येथे अपराध क्र. ६५/२०१८ कलम ३९२, सह कलम ३४ प्रमाणे नोंद करण्यात आला. त्यानंतर गुन्ह्यातील आरोपी जखमेश्वर शेनफड शिंदे याला अटक करण्यात आली. निवेदन पंचनाम्या दरम्यान आरोपीने चोरुन नेलेल्या पैशांमधील रू. २,०००/- हे त्याच्या घरातुन काढुन दिल्याने ते जप्त करण्यात आले. आरोपीस गुन्ह्यातील मोबाईल व बाकी पैसे याबाबत विचारणा केली असता, त्याने सांगीतले की त्याच्या वाट्याला आलेल्या पैशांमधून त्याने रू. २,०००/- ठेवले होते ते काढुन दिले, बाकी पैसे त्याच्या कडुन खर्च झाले. गुन्ह्यातील इतर तीन आरोपी यांच्याबाबत विचारपुस केली असता आरोपीने काहीही माहीती दिली नाही.

०३] अर्जदाराच्या वतीने विद्वान विधिज्ञ श्री. जी. ए. कोरडे यांनी युक्तिवाद केला की, घटना ही दिनांक १७.०४.२०१८ रोजी घडली. त्यानंतर अर्जदाराला दिनांक

२७.०८.२०२५ रोजी तब्ब्ल ७ वर्षानंतर अटक करण्यात आली. फिर्यादीच्या शेताचा ७/१२ उतारा दाखल करण्यात आलेला नाही. या प्रकरणात अर्जदाराची ओळख परेड घेण्यात आलेली नाही. फिर्याद ही अज्ञात इसमांविरूद्ध देण्यात आलेली आहे. अर्जदाराला या खोट्या गुन्ह्यात फसवण्यात आले आहे. अर्जदाराकडून काहीही जप्त करणे नाही. या प्रकरणाचा महत्त्वपूर्ण तपास संपलेला असून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आलेले आहे. त्यामुळे अर्जदाराच्या अधीक कोठडीची आवश्यकता राहिलेली नाही. अर्जदाराला जामीन मिळाल्यास तो जामीन आदेशावरील कोणत्याही अटी व शर्तींचे पालन करण्यास तयार आहे. म्हणून अर्जदाराला जामीनावर सोडण्याची विनंती करण्यात आली.

०४] याउलट, विद्वान सरकारी अभियोक्ता श्री. यु. एस. आपटे यांनी तपासी अंमलदाराच्या म्हणण्यावर जोर देऊन जामीन अर्जावर प्रखर आक्षेप घेतला. त्यांनी युक्तिवाद केला की, घटनास्थळ पंचनाम्यात घटनास्थळाचा उल्लेख आलेला आहे. अर्जदार हा फरार असल्याने त्याचेविरूद्ध फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २९९ खाली दोषारोपपत्र दाखल करण्यात आलेले आहे. अर्जदार हा गुन्हेगारी प्रवृत्तीचा असून त्याचेविरूद्ध या राज्यात व बाहेरील राज्यात अशाच स्वरूपाचे ७ गंभीर गुन्हे प्रलंबित आहे. त्यामुळे अर्जदाराला जामीन मिळाल्यास तो अशाच प्रकारच्या गुन्ह्याची पुनरावृत्ती करू शकतो. म्हणून अर्जदाराचा जामीन अर्ज नामंजूर करण्याची विनंती करण्यात आली.

०५] दोन्ही पक्षाच्या युक्तीवादाचे अनुषंगाने केस पेपरची पाहणी केली असता असे दिसून येते की, घटना ही दिनांक १७.०४.२०१८ रोजी घडली असून, अर्जदाराला दिनांक २७.०८.२०२५ रोजी अटक करण्यात आली आहे. अर्जदाराकडून रू. २,०००/– रक्कम जप्त करण्यता आल्यानंतर त्याला न्यायालयीन कोठडीत पाठवण्यात आले आहे. त्यामुळे जप्ती कामी व अधीक तपासाकामी अर्जदाराच्या कोठडीची आवश्यकता राहिलेली नाही. अर्जदाराविरूद्ध नोंद असलेल्या गुन्ह्यात शिक्षा झाली असे अभियोग पक्षाचे म्हणणे नाही. त्यामुळे केवळ गुन्हे प्रलंबित असल्याच्या कारणास्तव जामीन अर्ज नाकारणे न्यायोचित होत नाही. प्रस्तुत प्रकरण हे न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग यांच्या कार्यक्षेत्रातील आहे. या प्रकरणात ओळख परेड घेण्यात आलेली नाही. अर्जदाराला जामीन मिळाल्यास तो जामीन आदेशावरील कोणत्याही अटी व शर्तींचे पालन करण्यास तयार आहे. याउलट, अभियोग

पक्षाला असलेली भीती आणि साक्षीदारांचे संरक्षण कठोर अटी व शर्ती लादुन केले जावू शकते. म्हणून प्रकरणातील तथ्य परिस्थीती, अर्जदाराचे कृत्य आणि तपासाची स्थिती पाहता, अर्जदाराचा जमानत अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. करीता पुढील आदेश पारीत करण्यात येतो.

**– आ दे श –**

**०१]** नियमित जामीन अर्ज क्र. ४१/२०२६ मंजूर करण्यात येतो.

**०२]** अर्जदार – **जखमेश्वर शेनफड शिंदे** याला पोलीस ठाणे, साखरखेर्डा येथील अपराध क्र. ६५/२०१८, कलम ३९२ सह कलम ३४ भारतीय दंड संहिता, खालील गुन्ह्यात त्याचे वैयक्तिक रू. १,००,०००/– चे बंधपत्र व सदर रकमेचा जामीनदार दिल्यानंतर जामीनावर सोडण्यात यावे.

**०३]** अर्जदाराने अभियोग पक्षाच्या साक्षीदारांवर दबाव आणू नये किंवा साक्षीदारांना कोणत्याही स्वरूपाचे प्रलोभन दाखवून फितूर करू नये.

**०४]** अर्जदाराने या प्रकरणाचा निकाल लागेपर्यंत मौजे मोहाडी, ता. सिंदखेड राजा या गावात प्रवेश करू नये.

**०५]** अर्जदाराने यापुढे कोणत्याही स्वरुपाचा गुन्हा करु नये.

**०६]** अर्जदाराने वरील अटी व शर्तीचा भंग केल्यास त्याची जमानत रद्द करण्यात येईल.

**०७]** अर्जदाराने जामीनाची पुर्तता न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, सिंदखेड राजा यांच्याकडे करावी.

(आदेश खुल्या न्यायालयात लिखित व घोषित)

SAGAR KRISHNARAOJI MUNGILWAR
Digitally signed by SAGAR KRISHNARAOJI MUNGILWAR
Date: 2026.03.13 15:26:24 +0530

**(सागर कृ मुंगीलवार)**
**अतिरीक्त सत्र न्यायाधीश**
**मेहकर**

**दिनांक – ११.०३.२०२६**
**ठिकाण – मेहकर**

मी, खात्रीपूर्वक असे कथन करतो की, पी.डी.एफ. फाईल मधील आदेशाचा/न्यायनिर्णयाचा संपूर्ण मजकूर हा मूळ आदेशाप्रमाणे /न्यायनिर्णयाप्रमाणे शब्दशः, तंतोतंत व बरोबर आहे.

न्यायालयाचे नांव – श्री. सागर कृ मुंगीलवार,
अतिरिक्त सत्र न्यायाधीश, मेहकर.

लघुलेखकाचे नांव – शेख इम्रान अब्दुल रऊफ,
लघुलेखक ग्रेड – १, मेहकर

दिनांक – ११.०३.२०२६